॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone : (02462) 229242, 43
Fax : (02462) 215572

ACADEMIC (APPROVAL) SECTION

Website : srtmun.ac.in
E-mail : approvalsrtmun@gmail.com

# परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या मा.प्राचार्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार Stage I to II (Academic Level –11, AGP-7000) व Stage II to III (Academic Level–12, AGP-8000) करीता सेवांतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरीता खालील जिल्हानिहाय केंद्रांवरती छाननी समिती (Screening Committee) बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे दिनांक ३१/०८/२०२३ पर्यंत पात्र होणारे **सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव जिल्हानिहाय केंद्रावरती दिनांक ३१/०८/२०२३ पर्यंत सादर करावीत.**

**जिल्हानिहाय कॅस कॅम्प – २०२२–२०२३**

| अनु.क्र. | जिल्हा | केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | **नांदेड** | महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड. |
| २ | **परभणी व हिंगोली** | कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली. |
| ३ | **लातूर** | दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातुर. |

सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील पात्र शिक्षकांचे स्थाननिश्चिती/पदोन्नतीचे प्रस्ताव जिल्हा निहाय केंद्रावर सादर करण्यापूर्वी, संबंधीत महाविद्यालयांनी कार्यरत शिक्षकांना UGC Regulation 2018 प्रमाणे विविध स्तरावरील पात्रतेचे निकष पूर्ण करणा–या विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांनी स्थाननिश्चिती (कॅस) चे प्रस्ताव महाविद्यालयातील IQAC कक्षाकडून योग्य ती छाननी/तपासणी करून पात्र असल्याचा स्वतंत्र अहवाल प्राचार्यांकडे द्यावा. प्राचार्यांनी सदरील अहवालाची प्रत, महाविद्यालयाच्या कव्हरींग लेटरसह प्रस्तावाच्या चार प्रती प्रत्येक प्रकरण (Stage) करीता रू. २५००/– (रू. दोन हजार पाचशे फक्त) शुल्क भरणा करून जिल्हा निहाय केंद्रावरती सादर करावीत. संबंधीत जिल्हानिहाय केंद्रानी प्राप्त प्रस्तावाची छाननी (Scrutiny) करावी. विषय तज्ज्ञांच्या नामनिर्देशनासाठी प्रस्तुत विद्यापीठात पात्र शिक्षकांची विषयनिहाय यादी सादर करावी. त्यानंतर संबंधित जिल्हानिहाय केंद्रानी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार कॅम्पच्या आयोजनाची तारीख निश्चित करून संबंधितांना कळवावे.

(मागे पहाने...)

तसेच विद्यापीठ अनुदान आयोग विनियमानुसार CAS अंतर्गत पात्र शिक्षकांचे पदोन्नती/स्थाननिश्चितीचे प्रस्ताव संबंधीत जिल्हा केंद्रावरती सादर करावीत. सदरील प्रस्तावाची छाननी समितीने (Screening Committee) सकारात्मक शिफारस केल्यानंतर चार प्रस्तावापैकी एक प्रस्ताव विद्यापीठाकडे, एक मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड यांना व दोन प्रस्ताव संबंधीत महाविद्यालयास परत करावेत.

'ज्ञानतीर्थ' विष्णुपुरी, नांदेड. §
जा.क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२३—२४/१९० §
दिनांक : २८/०७/२०२३ §
३९

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:

१) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्राचार्य, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड ता. मुखेड जि. नांदेड.
३) मा.प्राचार्य, कै. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.
४) मा.प्राचार्य, दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातुर.
५) मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण सहसंचालनालय, नांदेड विभाग, नांदेड.
६) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.